४. अभिन्यासातील खुली जागा म्हणून निर्देश केलेला भूखंड खुली जागा म्हणूनच उपयोगात आणावा त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

५. अभिन्यासातील भूखंडात भविष्यात या कार्यालयाच्या पूर्व परवानगी शिवाय विभागणी करता येणार नाही.

६. भूखंडातील बांधकाम हे मंजूर प्रादेशिक योजना औरंगाबाद साठी लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार असावे.

७. अभिन्यांसातील भूखंडाचा वापर (खुली जागा व अॅमेनिटी स्पेस) अनुज्ञेय असलेल्या उपयोगासाठीच करावा.

८. विषयांकित प्रकरणी अर्जदार यांनी सादर केलेले कागदपत्रे दिशाभूल करणारी आढळून आल्यास ही शिफारस आपोआप रद्य समजण्यांत येईल.

९. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ ए ते एल नुसार विकास शुल्क रु. २,३२,२९०/-डिफेन्स चलन क्र.०००३३६९७८८२०१७१८ दि.०६.१०.२०१७ अन्वये भरणा करण्यात आला आहे.

१०. प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शुल्क, विकास शुल्क, सुरक्षा ठेव व कामगार कल्याण उपकर इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्भवल्यास सदर रक्कम महानगर नियोजन प्राधिकरण/जिल्हाधिकारी/ मुख्याधिकारी यांचकडे जमा करणे अर्जदारावर बंधनकारक आहे.

११. मंजूर प्रादेशिक योजनेतील तरतूदीच्या व त्या अंतर्गत नियमावलीनुसार शिफारस करण्यात येत आहे.

१२. विषयांकित जमिनीवर बांधकाम असल्यास ते स्वखर्चाने हटविण्यात यावे.

१३. प्रस्तावित अभिन्यासा लगत अभिन्यास मंजूर असल्यास सदर अभिन्यासातुन येणा-या रस्त्याची जुळवणी करणे व येणा-या रस्त्याचे अनुषंगाने अभिन्यास सुधारीत करणे अर्जदारास बंधनकारक राहिल.याबाबत आपल्या स्तरावर योग्य शहानिशा करण्यात यावी.

१४. प्रस्तावित भूखंडामध्ये, खुली जागेत व रस्त्याच्या कडेने योग्य ठिकाणी, जास्तीत जास्त झाडे, शक्यतो ३०० झाडे प्र.हे.प्रमाणे लागवड करण्यात यावी व ती जगविण्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्यात यावी.

१५. अभिन्यासातील भूखंडावर मंजूर प्रादेशिक योजना नियमावली प्रमाणे चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहील

१६. अर्जदाराचे मालकी हक्क, क्षेत्रफळ व जागेच्या हद्दी व पोच रस्त्याबाबत कृपया शहानिशा करावी.

१७. प्रस्तावित वापरासाठी स्थाक प्राधिकरणातर्फे कोणतीही सोयी/सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार नाही. उक्त जागेत पाणी पुरवठा, जल/मलनिसाःरण व्यवस्था, विज पुरवठा, घनकचरा, व्यवस्थापन इ. सर्व सुविधा अर्जदाराने आपल्या स्तरावर उपलब्ध करुन घ्याव्यात.

१८. रेनवॉटर हारवेस्टींग सिस्टीमची (Rain water harvesting system) व्यवस्था करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

१९. नवनगर मधील झोन प्लॅन नुसार सदर रस्ता मोजणी नकाशाप्रमाणे १८.०० मी. रुंद रस्ता अर्जदार यांच्या हद्दीतून प्रस्तावित आहे. परंतू जागेवर अस्तित्वातील रस्ता जागेपासून वेगळा असल्याने रस्त्याबांबत भविष्यात काही वाद उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदार यांची राहील.

२०. सदर क्षेत्र हे औरंगाबाद महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात समाविष्ट आहे. तथापि शासन नगर विकास विभागाचे पत्र क्र. टिपीएस-१११७/२१२/प्र.क्र.१०६/१७/नवि-९, दि. २७.०९.२०१७ अन्वये कळविल्यानुसार शिफारस महसूल विभागाकडे करण्यात येत आहे. भविष्यात प्रश्न उपस्थित झाल्यास मा. महानगर आयुक्त, औरंगाबाद महानगर प्रदेश विकास प्राधिकरण औरंगाबाद विभागाची नाहरकत घेणे बंधनकारक राहील.

**अंतिम** मंजूर अभिन्यासाची एक प्रत या कार्यालयाचे अभिलेखासाठी ठेवण्यात येऊन दोन प्रती आपल्याकडे पाठविण्यात येत आहे.

आपला,

सहपत्र : वरीलप्रमाणे.

सहायक संचालक, नगर रचना,
औरंगाबाद.

प्रत :- १) उपअधिक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
२) अर्जदार :- श्री. आण्णा भिकाजी मुळे व साईनाथ भिकाजी मुळे यांना माहितीस्तव.

Seal of the Sub-Registrar Aurangabad
अ ग ग -६
१३०२ | १९ | ३३
२०१८